# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**विद्यापीठ अधिकार मंडळांच्या निवडणुकींसाठी महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि महाविद्यालयीन/परिसंस्थातील विभागप्रमुख या मतदारसंघांतील निवडणुका पारदर्शीपणे पार पडण्याच्या प्रक्रियेबाबत**

## जाहीर प्रकटन

या प्रकटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(द) अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील **१० अध्यापक** आणि कलम २८(२)(ध) अन्वये **०३ विद्यापीठ अध्यापक** अधिसभेवर तसेच कलम ३२(३)(छ) अन्वये प्रत्येक विद्याशाखेचे **०२ अध्यापक** विद्यापरिषदेवर व ४०(२)(ग) अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील **०३ विभागप्रमुख** प्रत्येक अभ्यासमंडळावर निवडून देण्यासाठीची निवडणूक रविवार, दिनांक ०८ जानेवारी, २०२३ रोजी होणार आहे. सदर मतदान पारदर्शी पध्दतीने होण्याच्यादृष्टीने विद्यापीठाच्या निवडणूक विभागाने सक्षम यंत्रणा उभारलेली आहे. निवडणुकीच्या नियमांच्या तरतुदीनुसार उमेदवार स्वतः अथवा त्याने नेमलेला प्रतिनिधी प्रत्येक मतदान केंद्रावर/बुथवर उपस्थित राहून पारदर्शी निवडणूक प्रक्रियेवर देखरेख ठेऊ शकतो. त्यादृष्टीने अनुसरावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

१. उक्त नमूद निवडणुका एकूण ४५ मतदान केंद्रांवरील ५२ मतदान बुथवर होणार असून या सर्व बुथवर प्रत्येक उमेदवार आपल्या प्रतिनिधीची विहीत प्रक्रियेद्वारे नेमणूक करू शकतो.

२. उमेदवाराने अशा प्रतिनिधीस विहीत नमुन्यातील उमेदवाराच्या सहीचे अधिकार पत्र देऊन त्याद्वारे सदर प्रतिनिधी संबंधित केंद्राध्यक्षांकडून ओळखपत्र प्राप्त करू शकतो. मात्र असा प्रतिनिधी त्या निवडणुकीच्या मतदार यादीमधील मतदार असणे आवश्यक आहे.

उपरोक्त तरतुदीनुसार जास्तीतजास्त उमेदवारांनी त्यांचे जास्तीतजास्त प्रतिनिधी नेमून पारदर्शी निवडणूक प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/०३
दिनांक : ०२ जानेवारी, २०२३

D:\Election 2022 (Bhosale)\Teacher\Prakatan.docx